
महाराष्ट्राचा हक्काचा आवाज
दैनिक बीड लोकनेता
● मुख्य संपादक : ज्ञानेश्वर मुंढे ●
Lokneta News - लोकनेता न्युज




शुक्रवार १९ जून २०२६ | RNI-MAHMAR/2023/89402 | Email : dnyaneshmofficial@gmail.com | वर्ष : ०३ अंक : २९८ | किंमत २ रुपये | 7499615933

# आता शरद पवारांनाही मोठा धक्का; पक्षात फूट? काही खासदार संपर्कात

## सूत्रांच्या माहितीनुसार शरद पवार यांच्या पक्षाचे काही खासदार हे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या संपर्कात आहेत



**लोकनेता न्युज नेटवर्क**

ठाकरे यांच्या शिवसेनेतील सहा खासदारांनी बंडखोरी केल्याने सध्या राज्याच्या राजकारणात एकच खळबळ उडालेली आहे. हे खासदार लवकरच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पक्षात सामील होण्याची शक्यता आहे. हे बंड रोखण्याचा ठाकरे गटाकडून प्रयत्न करण्यात आला. परंतु सध्यातरी यात यश येण्याची शक्यता कमी असल्याचे बोलले जात आहे. कायदेशीर बाबी तपासून झाल्यानंतरच या बंडखोर खासदारांचा शिंदे गटातील प्रवेश जाहीर केला जाणार आहे. खासदारांनी बंड केल्यानंतर आता ठाकरे गटाकडून या खासदारांच्या अपात्रतेसाठी कायदेशीर मार्गांचा अवलंब केला जात आहे. विरोधी बाकावर असलेल्या ठाकरे गटाच्या शिवसेनेत या घडामोडी घडत असतानाच आता राज्याच्या राजकारणात खळबळ उडवून देणारी आणखी एक माहिती समोर आली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार आता शरद पवार यांच्या पक्षातील काही खासदार हे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या संपर्कात आहेत.

**सुनेत्रा पवार यांची अमित शाहांसोबत चर्चा**

सूत्रांच्या माहितीनुसार शरद पवार यांच्या पक्षातही मोठी फूट पडू शकते. कारण शरद पवार यांच्या पक्षाचे काही खासदार हे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या संपर्कात असल्याचे सांगितले जात आहे. पडद्यामागे बऱ्याच घडामोडी घडत आहेत. सुनेत्रा पवार आणि शरद पवार यांचे काही खासदार यांच्यात चर्चा सुरू आहे. दुसरीकडे सुनेत्रा पवार यांनी संपर्कात असलेल्या खासदारांबाबत केंद्रीय गृहमंत्री तथा भाजपाचे नेते अमित शाहा यांच्याशी चर्चा केली आहे. या चर्चेवेळी खासदार पार्थ पवार हेदेखील उपस्थित होते, असे सांगितले जात आहे.

### नेमके कोणते खासदार सुनेत्रा पवारांच्या संपर्कात?

लोकसभेच्या 2024 सालच्या निवडणुकीत शरद पवार यांच्या पक्षाला एकूण आठ जागांवर विजय मिळवता आला होता. म्हणजेच लोकसभेत शरद पवार यांचे एकूण आठ खासदार आहेत. तर याच निवडणुकीत अजित पवार यांना फक्त एकाच जागेवर विजय मिळवता आला होता. शरद पवार यांच्या एकूण 8 खासदारांपैकी काही खासदार हे सुनेत्रा पवार यांच्या संपर्कात असल्याचे बोलले जात आहे. परंतु हे खासदार नेमके किती आहेत? ते खासदार कोण आहेत? याची नेमकी माहिती समोर आलेली नाही. त्यामुळे आता भविष्यात नेमके काय घडणार? याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# राष्ट्रवादी (शप) शहराध्यक्ष महादेव गंगणे पाटील यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने सिकंदराबाद विभागीय रेल्वे व्यवस्थापकांना सोपवले पत्र

***परळी रेल्वे प्रवाशांच्या आंदोलनाची खासदारांकडून दखल; रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना साकडे!***

**लोकनेता न्युज नेटवर्क**

बालाजी जगतकर (प्रतिनिधी) बीड लोकसभा मतदारसंघाचे खासदार बजरंग (बाप्पा) मनोहर सोनवणे यांनी परळी वैजनाथ रेल्वे टर्मिनसच्या विकासासाठी आणि प्रवाशांच्या दीर्घकालीन मागण्या पूर्ण करण्यासाठी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे शहराध्यक्ष महादेव गंगणे पाटील यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने दक्षिण मध्य रेल्वे सिकंदराबाद विभागीय रेल्वे व्यवस्थापक आर. गोपालकृष्णन मार्फत पत्राद्वारे महत्त्वाच्या मागण्या केल्या आहेत.

८ जून रोजी परळी वैजनाथ येथे रेल्वे प्रवाशांनी केलेल्या 'एक दिवशीय धरणे आंदोलना'ची दखल घेत खासदारांनी हे पत्र लिहून रेल्वेमंत्र्यांकडे तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष महादेव गंगणे पाटील, ज्येष्ठ नेते अॅड. जीवनराव देशमुख,गटनेते नितीन बागवाले,नगरसेवक कादर कुरेशी, कार्याध्यक्ष बदर भाई, श्रीनिवास राऊत, संघटक सद्दाम शेख, बाबा शेख, अरुण सपाटे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर रेल्वे प्रवासी उपस्थित होते.

पत्रातील प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे;

* मछलीपट्टनम-बिदर एक्सप्रेसचा परळीपर्यंत विस्तार : २०२० मध्ये शिफारस केलेली ट्रेन क्र. १२७४९/१२७५० मछलीपट्टनम-बिदर एक्सप्रेस परळी वैजनाथपर्यंत वाढवण्याची मागणी अद्याप प्रलंबित आहे. हा विस्तार केल्यास हैदराबाद,



विकाराबाद, बिदर, उदगीर, लातूर रोड आणि परळी वैजनाथ दरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मोठा फायदा होईल, तसेच हैदराबाद विमानतळाशी कनेक्टिव्हिटी सुधारेल. या विस्तारासाठी कोणत्याही इंजिन रिव्हर्सल किंवा ट्रेन नंबर बदलण्याची गरज भासणार नाही.

* कुंभमेळ्यासाठी विशेष रेल्वे गाड्या : नाशिक येथे आगामी काळात होणाऱ्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर हैदराबाद, बिदर आणि कलबुरागी ते नाशिक रोड (परळी वैजनाथ मार्गे) अशा विशेष/अतिरिक्त रेल्वे फेऱ्या सुरु करण्यात याव्यात.

* परळी टर्मिनसवर पिट लाईनची निर्मिती : रेल्वे गाड्यांच्या देखभालीसाठी (Maintenance) आणि भविष्यातील रेल्वे विस्तारासाठी परळी वैजनाथ टर्मिनस येथे पिट लाईन (PIT Line) सुविधा मंजूर करून ती त्वरित उभारण्यात यावी.

खासदार बजरंग सोनवणे यांनी या मागण्या प्रवाशांच्या हिताच्या असून, रेल्वे मंत्रालयाने यावर सकारात्मक व तातडीने निर्णय घ्यावा, अशी विनंती पत्रात केली आहे. या पत्राच्या प्रती रेल्वे बोर्डाचे अध्यक्ष आणि दक्षिण मध्य रेल्वेचे (SCR) महाव्यवस्थापक यांनाही आवश्यक कार्यवाहीसाठी पाठवण्यात आल्या आहेत.

# बंडखोरीकरण्याची परभणी लोकसभेची परंपरा कायम

**खासदार संजय जाधव यांनी सोडली ठाकरेची साथ**



**लोकनेता न्यूज नेटवर्क**

*वडीगोद्री /त्रिसिंग जायभाये परभणी : शिवसेनेचे उपनेते तथा विद्यमान खासदार संजय जाधव यांनी दि. १७ जून रोजी बुधवारी उद्धव ठाकरे यांची साथ सोडून एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत सामिल झाले. परभणी लोकसभेला बंडखोरीची कायम लागलेली परंपरा म्हणावीच लागेल. कारण कै. अशोक देशमुख, अॅड. सुरेश जाधव,अॅड.

तुकाराम रेंगे पाटील, अॅड. गणेशराव दुधगांवकर आता ज्यांनी खासदारकीच हॅट्रीक साधली होती.बंडखोरी आपल्या रक्तात नाही असे ते वारंवार म्हणत असत.पण अपेक्षे प्रमाणे बंडोखोरीचा झेंडा फडकवून परभणी लोकसभा बंडखोरीकरण्याची परभणी जिल्ह्याची परंपरा कायम ठेवली.

# जून महिना अर्धा संपला तरी पावसाचा पत्ताच नाही
# मृग कोरडा गेल्याने बळीराजा चिंतेत

**लोकनेता न्युज नेटवर्क**

किनवट प्रतिनिधी शेख शौकत*

तीव्र उन्हाळ्यानंतर मृग नक्षत्रात आता शेतकऱ्यांना पावसाचे वेध लागले आहेत. आकाशातील २७नक्षत्रांपैकी पावसाच्या आगमनाचा खरा हर्षोल्हास ज्या नक्षत्रापासून सुरू होतो, ते मृग नक्षत्र ८ जून रोजी सुरू झाले आहे. दरवर्षी साधारणपणे ७ जून रोजी सुर्य मृग नक्षत्रात प्रवेश करतो, मात्र यंदा खगोलीय गणनेनुसार हा प्रवेश ८ जून रोजी झाला असून सुर्य २२ जूनपर्यंत या नक्षत्रात राहणार आहे. मृग नक्षत्राचा हा काळ ग्रामीण भागात शेतीकामांना वेग देणारा ठरतो. या काळात शेतकरी खरीप हंगामाच्या पेरण्याचे नियोजन करतात. भारतीय हवामान आणि शेतीची परंपरा नक्षत्रांवर आधारीत आहे. मान्सूनच्या म्हणजेच खरीप हंगामाच्या काळात प्रामुख्याने ९ मुख्य नक्षत्रे येतात. या नक्षत्रांच्या पावसावर खरीपपैकी सोयाबीन, कापूस, तूर अवलंबून असतात. त्यातच नक्षत्रानुसार शेतीसाठी पावसाचा अंदाज असतो. शेतजमीन तयार करून व पेरण्यांना प्रारंभ अंदाजे २२ जून ते ६ जुलै हा काळ उत्तम मानतात. मात्र यावर्षी मृग नक्षत्र कोरडा जात असल्यामुळे बळीराजा चिंतेत सापडत चालला आहे. किनवट तालुक्यात जून महिना अर्धा संपला तरी पावसाचा पत्ताच नसल्यामुळे तालुक्यातील पेरण्या खोळंबल्या आहेत. त्यामुळे शेतकरी चिंतातूर झाला असून



पावसाची चातकाप्रमाणे वाट पाहत आहेत. पावसाच्या भरवशावर शेतकऱ्यांनी बियाणे घरी आणून ठेवले असून पावसाची प्रतीक्षा करु लागले आहेत. मागील वर्षी जूनच्या पहिल्या आठवड्यात पावसास सुरुवात झाली होती. मात्र यंदा १६ जूनपर्यंत आकाश निरभ्र असून, कडक उन्हामुळे परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे. पावसाअभावी ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न बिकट बनला आहे. काही ठिकाणी बोअरवेल तर काही ठिकाणी विहिरींवर पाणीपुरवठा अवलंबून आहे. काही ठिकाणी उपलब्ध ओलिताच्या सोयीमुळे शेतकऱ्यांनी कापूस लागवड सुरू केली आहे. मात्र, मजूर उपलब्धतेचा प्रश्न आणि पावसाची अनिश्चितता यामुळे चिंता वाढली आहे. कोरड्या परिस्थितीत लागवड केलेल्या शेतकऱ्यांचे पाऊस लवकर न पडल्यास मोठे नुकसान होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेवरही परिणाम जाणवत असून, बाजारपेठेत शुकशुकाट निर्माण झाला आहे.

# शिंगाडे वस्ती शाळेत प्रवेशोत्सव उत्साहात; चिमुरड्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप !

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

इंदापूर ता. प्रति:- राहुल जाधव

इंदापूर: शेळगाव येथील शाळा शिंगाडे वस्ती येथे नवीन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांचा 'प्रवेशोत्सव' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. नवीन वातावरणात आलेल्या पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांचे शिक्षकांनी आनंदाने स्वागत केले.विद्यार्थ्यांचा शिक्षणाप्रती




उत्साह वाढवण्यासाठी शाळे शिक्षणप्रेमी कदून सर्व विद्यार्थ्यांना वह्या, पेन, कंपास पेटी, टिफिन बॅग, पेन्सिल आणि रंगीत खडू अशा उपयुक्त शैक्षणिक साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले. नवे साहित्य हाती पडताच विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर मोठा आनंद दिसून आला. या उपक्रमामुळे पालकांनीही शाळेचे आभार मानले असून, विद्यार्थ्यांची शाळेतील पहिली पावले अधिक आनंददायी झाली आहेत.

यावेळी भाजपा युवा मोर्चा अध्यक्ष शुभम शिंगाडे, तंटामुक्ती अध्यक्ष श्री. तात्यासो शिंगाडे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री.अमोल शिंगाडे, उपाध्यक्षा सौ.ऐश्वर्या ननवरे, मुख्याध्यापक श्री. भारत बरळ, उपशिक्षका सौ.सुरेखा बनकर, अंगणवाडी सेविका सौ.लक्ष्मी मोहिते, गणेश शिंगाडे, महेश घाडगे, हर्षल शिंगाडे, मंगेश शिंगाडे, दिलीप शिंगाडे, सौरभ शिंगाडे पालक व ग्रामस्थ आदी उपस्थित होते.

# उरणच्या १७ तारखेचा आगळा वेगळा आनंद !

## कवी संमेलन उत्साहात संपन्न..

**लोकनेते न्यूज नेटवर्क**

उरण विठ्ठल ममताबादे

दर १७ तारखेला उरण शहरातील विमला तलावावर कविकट्टा नियमित भरतो ऐकून होतो,तो प्रत्यक्ष अनुभवण्याचा आनंद कोमसाप उरणने दिलेल्या कार्यक्रमाचे अध्यक्ष पदामुळे मिळाला.कट्ट्यावरची सहजता, कार्यकर्त्यांची,तत्परता आणि अध्यक्षांचे कामामातील योगदान आणि मांडणी आगळीवेगळी आणि



आनंददायी वाटली असे विचार अध्यक्ष डॉ जयपाल पाटील यांनी मांडले.यावेळी साहित्य रत्न प्रा.एल.बी.पाटील, कोकण रस्त्याचे अभ्यासक चैतन्य उषा लक्ष्मण, प्राचार्य साहेबराव ओहोळ , भुवनेश्वर पाटील, राम म्हात्रे,देवदत्त सूर्यवंशी, मारोती तांबे, मिना ब्रीद,प्रवीण पुरो, विवेक भांडारकर,जेष्ठ पत्रकार घनशाम कडू, तृप्ती भोईर इत्यादींची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक मच्छिंद्र म्हात्रे यांनी केले तर सूत्रसंचालन संजय होळकर यांनी उत्तमपणे केले.

आगरी ज्येष्ठ कवी पुंडलिक म्हात्रे यांना जीवनगौरव पुरस्काराने गौरविण्यात आले,तर सुनील पाटील, मनोहर म्हात्रे,न.ग. पाटील,अवंतिका महाडिक, वैभव धनावडे ,कल्पना म्हापुसकर यांना बक्षिस पात्र " एल्गार टोल विरुध्द कविता " साठी सन्मानित करण्यात आले.

झालेल्या कविसंमेलनात संजीव पाटील,अनिल भोईर, हेमंत पाटील,सूरेश मिस्त्री, रामचंद्र म्हात्रे, अनामिका राम,मनोहर म्हात्रे,नारायण पाटील,संजय होळकर, सुनील पाटील यांनी पावसाच्या आगमनानंतर कविता सादर केल्या.सदर कवी संमेलन मोठया उत्साहात आनंदमय वातावरणात संपन्न झाले.

## नांदेड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणूक-2026 99.78 टक्के मतदान, आठ पैकी सात केंद्रावर शंभर टक्के मतदान



लोकनेता न्युज नेटवर्क

नांदेड जिल्हा प्रतिनिधी/संतोष चिद्रावार लोणीकर

नांदेड, दि. 18 जून :- महाराष्ट्र विधान परिषदेच्या नांदेड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या निवडणुकीचे मतदान आज 18 जून रोजी शांततेत व सुरळीत पार पडले. या निवडणुकीत जिल्ह्यातील आठ मतदान केंद्रावर 452 पैकी 451 मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. त्यामुळे एकुण मतदानाची टक्केवारी 99.78 टक्के नोंदवण्यात आली. किनवट, हदगाव, नांदेड, कंधार, धर्माबाद, बिलोली, देगलूर या सात ठिकाणी 100 टक्के मतदान तर भोकर मतदान केंद्रावर 97.92 टक्के मतदान झाले आहे. या निवडणुकीची मतमोजणी सोमवार 22 जून 2026 रोजी सकाळी 8 वाजता कॅबिनेट हॉल, नियोजन भवन तळमजला जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे होणार आहे.

नांदेड विधान परिषद निवडणुकीच्या रिंगणात तीन उमेदवार आहेत. निवडणुकीसाठीची मतदान प्रक्रिया आज सकाळी 8 ते दुपारी 4 यावेळेत पार पडली. त्यासाठी निवडणूक कार्यालयाने काटेकोर नियोजन केले होते. निवडणूक प्रक्रिया शांतता व सुव्यवस्थेत पार पडावी यासाठी पुरेशा पोलीस बंदोबस्तासह, मतदान प्रक्रियेवर वेब कॅमेऱ्यांद्वारे करडी नजर ठेवण्यात आली होती. मतदानासाठी मतदान केंद्र म्हणून आठही उपविभागीय कार्यालयस्तरावर तहसील कार्यालयांची निश्चिती करण्यात आली होती. निवडणूक निरिक्षक डॉ. माधवी खोडे-चवरे यांनी नांदेड, बिलोली, हदगाव, भोकर, धर्माबाद या मतदान केंद्रास भेट देऊन व्यवस्थेची पाहणी केली. निवडणूक निर्णय अधिकारी राहुल कर्डिले यांनीही नांदेड मतदान केंद्रातील व्यवस्थेची पाहणी केली.

सकाळी 8 वाजता मतदान प्रक्रियेस प्रारंभ झाला. सकाळी 10 वाजेपर्यत 4.87 तर दुपारी 12 वाजेपर्यंत जिल्ह्यात 56.86 टक्के मतदान झाले होते. त्यानंतर दुपारी 2 वाजेपर्यंत 88.94 टक्के मतदान झाले. अंतिमतः दुपारी 4 वा. जिल्ह्यातील आठ मतदान केंद्रावर 452 पैकी 451 मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. या 452 मतदारांमध्ये 228 मतदार पुरूष तर 224 मतदार स्त्रिया होत्या. त्यातील 228 पुरूष मतदारांनी तर 223 स्त्री मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला.

मतदानानंतर जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रावरील मतपेट्या जिल्हाधिकारी कार्यालय नियोजन भवन येथे जमा करून, त्या कडेकोट बंदोबस्तात ठेवण्यात येणार आहेत. निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी प्रत्यक्ष भेट देऊन व्यवस्थेची पाहणी केली. या स्ट्राँगरूमवरही कॅमेऱ्यांची नजर राहणार असून, सुरक्षेसाठी कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात येणार असल्याचे जिल्हा निवडणूक कार्यालयाने सांगितले.


## निधन वार्ता



कै.पद्मावती बालाजी देशपांडे यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे. त्यांच्या निधनाने कुटुंबीयांवर तसेच नातेवाईक व मित्रपरिवारावर शोककळा पसरली आहे.
त्यांचा अंत्यविधी शुक्रवार, दि. १९ जून २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता संपन्न होणार आहे.
ईश्वर त्यांच्या पवित्र आत्म्यास चिरशांती देवो व दुःखाच्या या प्रसंगी त्यांच्या कुटुंबीयांना हे दुःख सहन करण्याची शक्ती प्रदान करो, हीच भावपूर्ण श्रद्धांजली.
त्याच्या पश्चात एक मुलगा एक मुलगी आहे

# नांदेड जिल्ह्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या राज्यस्तरीय महाअधिवेशनास उपस्थित राहण्याचे आवाहन

**लोकनेता न्युज नेटवर्क**
देगलूर प्रतिनिधीग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांच्या सोडवणुकीसाठी तसेच संघटनेची ताकद वाढविण्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथे दि. 20 जून 2026 रोजी राज्यस्तरीय महाअधिवेशनाचे आयोजन करण्यात आले असून, नांदेड जिल्ह्यातील ग्रामपंचायत कर्मचारी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी युनियनचे देगलूर तालुका अध्यक्ष शेख शादूल चाँदसाब यांनी केले आहे.
या संदर्भात माहिती देताना त्यांनी सांगितले की, कर्मचाऱ्यांच्या हक्कांसाठी व विविध प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी हे महाअधिवेशन अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. शनिवार, दि. २० जून २०२६ रोजी दुपारी १२ वाजता, अदिती लॉन्स, लाडगाव, छत्रपती संभाजीनगर येथे हे महाअधिवेशन आयोजित करण्यात आले आहे
महाअधिवेशनाला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार तसेच ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांची प्रमुख उपस्थिती अपेक्षित आहे.



याशिवाय संघटनेचे राज्याध्यक्ष तथा विधान परिषदेचे आमदार बच्चू कडू, संस्थापक राज्य सरचिटणीस गिरीश भाऊ देशमुखकर आणि राज्य सचिव अशोक भाऊ कुथे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.
नांदेड जिल्ह्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी या महाअधिवेशनास मोठ्या संख्येने उपस्थित राहून संघटनेची एकजूट दाखवावी, असे आवाहन शेख शादूल चाँदसाब यांनी केले आहे.

# गुलाबपुष्प देऊन केले विद्यार्थ्यांचे थाटामाटात स्वागत

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
इंदापूर ता. प्रति:- राहुल जाधव

इंदापूर: जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गौराई मळा (शेळगाव ) शाळेत इयत्ता पहिलीचा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला आहे.
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गौराईमळा शाळेत सोमवार दिनांक 15 रोजी इयत्ता पहिली मध्ये व अंगणवाडी मध्ये नव्याने दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे औक्षण करून गुलाबपुष्प देऊन त्यांचे थाटामाटात स्वागत करण्यात आले यावेळी सर्व विद्यार्थ्यांना पुस्तके व गणवेशांचे मोफत वाटप करण्यात आले .यावेळी शेळगाव ग्रामपंचायतचे उपसरपंच सौ .रेशमाताई जाधव ,ग्रामपंचायत सदस्य अश्विनीताई शिंगाडे,तंटामुक्ती अध्यक्ष श्री तात्यासाहेब शिंगाडे,शाळा व्यवस्थापन



समिती अध्यक्ष श्री सुरेश शिंगाडे,माजी व्यवस्थापन समिती अध्यक्ष अमोल नाझरकर,राहुल नाझरकर,मनीषाताई जाधव ,वैजंता सोनवणे, अंगणवाडीताई सुनिता जाधव व गौराईमळा ग्रामस्थ उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक श्री अशोक क्षीरसागर यांनी केले तर आभार उपशिक्षिका सौ सुवर्णा क्षीरसागर यांनी मानले.

# साधना पतसंस्थेची नूतन कार्यकारिणी गठित अध्यक्षपदी राजीव ताटे

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
देगलूर प्रतिनिधी /संतोष चिद्रावार लोणीकर
साधना हायस्कूल शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या नूतन कार्यकारिणी नुकतीच गठीत करण्यात आली असून अध्यक्षपदी राजीव ताटे यांची निवड करण्यात आली आहे .
बुधवार दि. 17 जून रोजी निर्वाचन अधिकारी तथा सहकार अधिकारी एस. डी. कोलमवाड आणि जी. एस. कुलकर्णी यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या निवडणूक प्रक्रियेत संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची एकमताने निवड करण्यात



आली. या निवडीत अध्यक्षपदी राजीव ताटे, उपाध्यक्ष _ डी. एस. देशमुख, सचिव_ उदय कदम तर कोषाध्यक्षपदी विकास कोयलावर यांची बिनविरोध निवड झाली. तसेच संचालक मंडळावर डी. एन. जाधव, वाय. एस. बत्तूलवार, एस. डी. धुळगंडे, आर. पी. सोनकांबळे, एन. एल. येमले, सौ. व्ही. पी. बेंड, सौ. जे. आर. गजभारे, एस. व्ही. भांगे आणि फारुकी ए. एम. यांची निवड करण्यात आली.
नवनिर्वाचित कार्यकारिणीचा सत्कार संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब देशमुख, उपाध्यक्ष राजेश जाधव, सचिव संग्राम अप्पा मळगे, पत्रकार मनोहर देगावकर ,युवा सेना जिल्हाध्यक्ष नामदेव थडके, संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष जेजेराव पाटील, संभाजी ब्रिगेड जिल्हा उपाध्यक्ष संतोष चिद्रावार लोणीकर आणि बी. एन. सुगावकर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी मनोगत व्यक्त करताना नवनिर्वाचित अध्यक्ष राजीव ताटे यांनी सभासदांच्या अडचणी व मागण्यांना प्राधान्य देण्यात येईल असे सांगितले. नव्या कार्यकारिणीच्या निवडीबद्दल शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि सभासदांनी समाधान व्यक्त करत पदाधिकाऱ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव केला.


# हदगाव तहसील कार्यालयात जन्म-मृत्यू प्रमाणपत्र कामासाठी कार्यालयात दलालांचा सुळसुळाट;

## सामान्य नागरिकात मोठ्याप्रमाणात कुजबुज.

***लोकनेता न्यूज नेटवर्क***
हदगांव । चंद्रकांत भोरे
मागील एक ते दीड वर्षापासून हदगाव तहसील कार्यालय अंतर्गत जन्म व मृत्यू प्रमाणपत्र कामकाज प्रक्रियेत संबधित कर्मचाऱ्यांकडून सदरील कामाचे काही देणे घेणे नसल्यागत मनमानी कार्य चालू असून या विभागात दलालांचे जाळे सक्रिय झाल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.चिरीमिरी घेऊन जन्म मृत्यू नोंद दलालांमार्फत संबधित विभागात दाखल करण्यात आलेल्या फाईलींना प्राधान्य देऊन अल्पावधीत मंजुरी दिली जात असल्याचेही नागरिकात चर्चा होताना दिसून येत आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या जन्म मृत्यू नोंद अर्ज अनेक महिने प्रलंबित ठेवल्या जात असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.काही अर्जदार नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, जन्म व मृत्यू प्रमाणपत्रासाठी अर्ज दाखल केल्यानंतर संबधित विभागात अनेकवेळा येरझारा मारून सुध्दा त्यांची कामे होत नाहीत. मात्र, काही दलालांच्या माध्यमातून अतिरिक्त रक्कम भरून दाखल करण्यात आलेल्या फाईलींवर तत्काळ कार्यवाही होत असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे "पैसे द्या आणि काम करून घ्या"अशी परिस्थिती निर्माण झाले असल्याचे आरोप काही नागरिकां कडुन केला जात आहे.शासनाने नागरिकांना पारदर्शक व वेळेत सेवा देण्यासाठी विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या असताना, स्थानिक स्तरावर मात्र काही कर्मचाऱ्यांच्या निष्क्रियतेमुळे आणि कथित संगनमतामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. प्रमाणपत्रासाठी वारंवार हेलपाटे मारणाऱ्या नागरिकांचा वेळ, पैसा आणि मानसिक त्रास वाढत असल्याचे चित्र आहे.या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्यात यावी, दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी तसेच दीर्घकाळ एकाच ठिकाणी कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांची बदली करून त्यांच्या जागी कार्यक्षम अधिकारी नियुक्त करावेत, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.
दरम्यान, तहसील कार्यालयातील जन्म-मृत्यू प्रमाणपत्र विभागाच्या कामकाजाची चौकशी झाल्यास अनेक धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात असून वरिष्ठ महसूल प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घ्यावी, अशी मागणीही नागरिकांनी केली आहे.

# हिमायतनगरमध्ये पोलिसांची मोठी कारवाई; 11 लाखांचा प्रतिबंधित गुटखा व कार जप्त.

**दै. लोकनेता न्यूज नेटवर्क**
हिमायतनगर लक्ष्मण शेन्नेवाड
येथे स्थानिक गुन्हे शाखा, नांदेड आणि स्थानिक पोलिसांनी 'ऑपरेशन क्रॅकडाऊन' अंतर्गत संयुक्त कारवाई करत मोठ्या प्रमाणात अवैध आणि प्रतिबंधित गुटखा जप्त केला आहे. या कारवाईत गुटखा, पानमसाला, सुगंधित जर्दा आणि वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली स्विफ्ट डिझायर कार असा एकूण ११,१५,६४० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे. या प्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे.गुप्त माहितीच्या आधारे सापळापोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नांदेडचे पोलीस अधीक्षक श्री. अविनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. अतुल भोसले व अन्न सुरक्षा अधिकारी श्रीमती अमृता दुधाटे यांच्या पथकाने हिमायतनगर परिसरातील वेस्ट कॉलनी, हजरत चौक येथे पेट्रोलिंग दरम्यान सापळा रचला होता. एका पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट डिझायर कारमधून




(क्रमांक MH 48 F 0708) प्रतिबंधित गुटख्याची अवैध वाहतूक केली जात असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती.घराची झडती आणि मुद्देमाल जप्तपोलिसांनी संशयास्पद कार थांबवून तपासणी केली असता, त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर गुटखा आणि पानमसाला आढळून आला. त्यानंतर पोलिसांनी अधिक चौकशी केली असता, आरोपी हिमायतनगर येथील एका भाड्याच्या खोलीमध्ये हा मुद्देमाल साठवून ठेवत असल्याचे समोर आले. पोलिसांनी त्या घरावर छापा मारून नायलॉनच्या पोत्यांमध्ये भरलेला सर्व प्रतिबंधित सुगंधित गुटखा आणि जर्दा जप्त केला.दोन आरोपींना अटकया प्रकरणी पोलिसांनी दोन आरोपींना ताब्यात घेतले आहे:१) मुसाखान पठाण (वय ३२ वर्षे, रा. संभाजीनगर, तामसा)२) शेख खान उर्फ शाहरूखखान मुसाखान पठाण (वय २८ वर्षे, रा. संभाजीनगर, तामसा)या दोन्ही आरोपींवर अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ च्या कलम गु.र.न.१६७/२०२६ कलम १२३,२७४,२७५ ३ (५) भा.न्या. सं.सह कलम २६, २७, २३, ३०(२) (अ) आणि भारतीय न्याय संहितेच्या (BNS) संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलीस अधीक्षकांकडून कौतुकगुटख्याच्या या मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश करणाऱ्या पोलीस अधिकारी आणि अंमलदारांच्या कामगिरीचे नांदेडचे पोलीस अधीक्षक श्री. अविनाश कुमार यांनी विशेष कौतुक केले आहे. या कारवाईमुळे हिमायतनगर आणि परिसरातील अवैध गुटखा तस्करांचे धाबे दणाणले आहेत.

# शहापूरच्या गायगोठा योजनेच्या चौकशी अहवालाने उडवली खळबळ

## *बड्या राजकीय नेत्यांनीही लाटली योजना?*

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
देगलूर ता / वंकलवार प्रभू

ग्रामपंचायतीअंतर्गत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील गायगोठा योजनेच्या चौकशी अहवालाने तालुक्यात खळबळ उडवून दिली आहे.
श्री राजेश रामराव पाटील शहापूरकर यांनी तक्रार दाखल केली होती.



प्रत्यक्ष पाहणी, जिओ-टॅग छायाचित्रे, मोजमाप पुस्तिका आणि शासकीय अभिलेखांमधील तफावत निदर्शनास आल्याने शासन निधीच्या वापराबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.
*चौकशीत काही कामे कागदोपत्री पूर्ण दाखविण्यात आली असली, तरी प्रत्यक्ष अस्तित्वात नसल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले आहे.* प्रत्यक्ष काम न करताच पूर्ण झाल्याचे दाखविणे, खोटी मोजमाप पुस्तिका तयार करणे, असंबंधित जिओ-टॅग फोटो जोडणे आणि अभिलेखांची योग्य जपणूक न करणे, अशा प्रकारांमधून शासकीय निधी कथितरीत्या कसा हडपला जाऊ शकतो, यावर या अहवालाने प्रकाश टाकला आहे.
विशेष म्हणजे, चौकशी अहवालात संबंधित तांत्रिक कर्मचारी (P.T.O.), रोजगार सेवक, लाभार्थी तसेच अभिलेख न सादर करणाऱ्या संबंधित ग्रामपंचायत अधिकाऱ्यांची जबाबदारी अधोरेखित करण्यात आली आहे. तर *ग्रामपंचायत शहापूरनेही ठराव क्रमांक ०६/०२, दि. २९ डिसेंबर २०२५ द्वारे विविध योजनांतील तक्रारींची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची भूमिका अधिकृतपणे नोंदवली आहे.*
*दरम्यान, "हा अहवाल इतर चौकशी अहवालांप्रमाणे दप्तरी पडून राहू देणार नाही. ग्रामपंचायतीने स्वतः कारवाईची मागणी केली असताना सार्वजनिक निधीच्या प्रत्येक रुपयाचा हिशोब घेतल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही," असा कडक इशारा 'जागरूक होऊ समूह, शहापूर' यांच्या माध्यमातून ॲड. एच. के. पोतदार यांनी दिला आहे.*
ग्रामस्थांमध्ये आता एकच चर्चा सुरू आहे – गोरगरिबांच्या गायगोठा योजनेत जर खरोखरच बड्या राजकीय नेत्यांसह प्रभावशाली घटकांनी लाभ घेतला असेल, तर या चौकशी अहवालानंतर प्रशासन दोषींवर कारवाई करणार की पुन्हा एकदा प्रकरण दप्तरीच गाडले जाणार? संपूर्ण देगलूर तालुक्याचे लक्ष आता प्रशासनाच्या पुढील भूमिकेकडे लागले आहे.

# राज्यस्तरीय आदर्श महाराष्ट्र समाजरत्न पुरस्कार 2026 प्रा. स्मिता शेखर यांना प्रदान.



**लोकनेता न्यूज नेटवर्क**
मुंबई : (प्रतिनिधी विजय जगताप)
ए. डी. फाउंडेशन महाराष्ट्र राज्य या संस्थेच्या माध्यमातून समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा महाराष्ट्र समाजरत्न पुरस्कार 2026 देऊन गौरव करण्यात आला. समाजासाठी सातत्याने कार्य करणाऱ्या महान व्यक्तींच्या कर्तृत्वाचा सन्मान व्हावा, त्यांना प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्या कार्यातून इतरांनाही प्रेरणा मिळावी या उद्देशाने हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. सोलापूर विजापूर रोडवरील निर्मिती लॉन्स येथील येथील सभागृहामध्ये अत्यंत उत्साहपूर्ण, दिमाखदार वातावरणात संपन्न झालेल्या या सोहळ्यात विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व सेवाभावी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी व सन्मानपत्र देऊन गौरवण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्याचे माजी दुग्धविकास कॅबिनेट मंत्री मा. श्री महादेव जानकर तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त मा. श्री प्रदीप गोरड, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या मा. मनीषा माने, राष्ट्रीय समाज पक्षाचे युवक प्रदेशाध्यक्ष मा. श्री अजित पाटील, स्वागताध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सांगली जिल्हा अध्यक्ष मा. श्री विवेक कोकरे, संस्थापक अशोक गोरड यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी ए. डी. फाउंडेशनच्या सकारात्मक विधायक व सातत्यपूर्ण वाटचालीबद्दल सर्वच मान्यवरांनी कौतुक केले.

तसेच व्यासपीठावरील प्रमुख पाहुणे माजी मंत्री श्री महादेव जानकर, सहाय्यक पोलीस आयुक्त श्री प्रदीप गोरड आणि इतर मान्यवरांचे स्वागत आणि प्रास्ताविक फाउंडेशनचे अध्यक्ष अशोक गोरड यांनी केले.

शिक्षण, सेवाभाव आणि सुसंस्कृत दृष्टिकोन या तीन आधारांवर उभे असलेले व्यक्तिमत्व म्हणजे ताम तलाव, वसई, जि. पालघर येथील प्रा. स्मिता शेखर कांबळे. शैक्षणिक क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या प्रा. स्मिता शेखर कांबळे यांची प्रामाणिकता, विद्यार्थ्यांच्या पालकांशी असलेला थेट संवाद आणि शैक्षणिक गुणवत्ताविषयी दृष्टिकोनामुळे पालकांचा ठाम विश्वास त्यांनी संपादन केला आहे. प्रा. स्मिता कांबळे यांचा प्रामाणिकपणा आणि निर्णयक्षमता यामुळे त्यांना वसई येथील सर्वसामान्य नागरिकांमध्ये आदराचे स्थान आहे. त्यांच्या शैक्षणिक कार्यातून आजही अनेक युवती प्रेरणा घेतात आणि आत्मनिर्भर बनण्यासाठी यशस्वी पाऊले टाकत आहेत. म्हणूनच त्यांना अनेक राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. अनेकांना त्यांनी शैक्षणिक मार्गदर्शन करून स्वावलंबी बनवले आहे. त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन शैक्षणिक क्षेत्रातील आदर्श शिक्षिका म्हणून राज्यस्तरीय आदर्श महाराष्ट्र समाजरत्न पुरस्कार 2026 देऊन त्यांना गौरवण्यात आले.

कार्यक्रमात निवड झालेल्या सर्व पुरस्कार्थींना मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ए. डी. फाउंडेशन समूहाच्या संपूर्ण टीमने विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. घनश्याम चौगुले यांनी प्रभावीपणे करुन उपस्थित मान्यवरांचे आभार मानले. हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला असून समाजातील महान व्यक्तींच्या कर्तृत्वाला सलाम करणारा, प्रेरणादायी सोहळा ठरला.

# परळी रेल्वे विकासासाठी नागरिकांचे रेल्वे प्रशासनाकडे निवेदन

## पिट लाईन, नवीन रेल्वेगाड्या, वंदे भारतसह विविध मागण्यांचा पाठपुरावा

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
परळी वैजनाथ | प्रतिनिधी
परळी वैजनाथ रेल्वे स्थानकाच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच रेल्वे प्रवाशांच्या विविध प्रलंबित मागण्या पूर्ण करण्याच्या अनुषंगाने परळी रेल्वे विकास समिती, मराठवाडा जनता विकास परिषद आणि विविध सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी रेल्वे प्रशासनाकडे सविस्तर निवेदन सादर केले आहे.

शतकाहून अधिक वर्षांचा इतिहास असलेले परळी वैजनाथ रेल्वे स्थानक दक्षिण मध्य रेल्वेच्या महसूल देणाऱ्या महत्त्वाच्या स्थानकांपैकी एक असूनही अपेक्षित पायाभूत सुविधा आणि रेल्वे सेवांपासून हा परिसर वंचित असल्याची खंत निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर रेल्वेच्या विविध विकासकामांसह नवीन रेल्वे सेवा सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात परळी वैजनाथ जंक्शनचे मध्य



रेल्वेमध्ये हस्तांतरण, स्थानकावर पिट लाईन मंजूर करणे, तसेच ज्योतिर्लिंग दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी पर्यटक माहिती केंद्र उभारणे या प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. तसेच मुंबई-लातूर एक्सप्रेस, मछलीपट्टणम-बिदर एक्सप्रेस आणि हैदराबाद-बिदर इंटरसिटी या रेल्वेगाड्यांचा परळी वैजनाथपर्यंत विस्तार करण्याची मागणी करण्यात आली आहे. याशिवाय चार ज्योतिर्लिंगांना जोडणारी 'ज्योतिर्लिंग एक्सप्रेस', सिकंदराबाद-जम्मू तवी, कन्याकुमारी-उधमपूर, रामेश्वरम-ओखा आणि हैदराबाद-अजमेर या नवीन रेल्वे सेवाही परळी मार्गे सुरू करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे.

परळी वैजनाथ, पुणे, मुंबई आणि हैदराबाद यांना जोडणारी वंदे भारत एक्सप्रेस सुरू करण्याची मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. तसेच कोल्हापूर-धनबाद आणि कोल्हापूर-नागपूर या रेल्वेगाड्या दररोज चालविण्याची मागणी करण्यात आली आहे.

शहरातील वाढती वाहतूक लक्षात घेऊन जलालपूर परिसरात नवीन रेल्वे उड्डाणपूल, तसेच शिवाजीनगर व जुन्या बसस्थानक परिसरात भुयारी मार्गांची उभारणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. याशिवाय मानवत-पाथरी-सोनपेठ-परळी आणि घाटनांदूर-अंबाजोगाई-जामखेड-दौंड या महत्त्वाच्या रेल्वे प्रकल्पांसाठी विशेष अर्थसंकल्पीय तरतूद करण्याची मागणीही करण्यात आली आहे. हे निवेदन दक्षिण मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक, मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक आणि रेल्वे बोर्डाचे अध्यक्ष यांना पाठविण्यात आले आहे.

या निवेदनावर जी. एस. सौंदळे, कैलास तांदळे, चेतन सौंदळे, सत्यनारायण दुबे, श्रीकांत पाथरकर, आर. जी. स्वामी, मिलिंद घाडगे, चित्रा देशपांडे, विद्या खिस्ते, विजया दहिवळ, माऊली आघाव, गजानन कोकीळ आणि शेख होबीह यांच्यासह विविध संघटनांच्या प्रतिनिधींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

परळीसह बीड जिल्ह्याच्या रेल्वे विकासासाठी या मागण्या मान्य झाल्यास मराठवाड्याच्या आर्थिक, धार्मिक आणि पर्यटन विकासाला मोठी चालना मिळेल, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला आहे.-------------------------------------------

# पाथर्डी-शेवगाव मतदारसंघात मनसेच्या पक्षबांधणीला वेग; नयन कदम यांचे कार्यकर्त्यांना एकजुटीचे आवाहन





**दै.लोकनेता न्यूज नेटवर्क**
| बाळासाहेब खेडकर, पाथर्डी
महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सरचिटणीस तथा अहिल्यानगर संपर्कप्रमुख मा. नयन कदम साहेब यांनी पाथर्डी-शेवगाव विधानसभा मतदारसंघाचा पक्षबांधणी दौरा करून कार्यकर्त्यांशी संवाद साधला. यावेळी पाथर्डी तालुक्यातील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पदाधिकारी व महाराष्ट्र सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.
दौऱ्यादरम्यान मनसेचे तत्कालीन जिल्हाध्यक्ष स्वर्गीय देविदास भाऊ खेडकर यांच्या पाथर्डी येथील निवासस्थानी नयन कदम यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी खेडकर कुटुंबीयांशी संवाद साधत देविदास भाऊ यांनी पक्ष संघटन वाढीसाठी घेतलेल्या परिश्रमांची आठवण करून दिली. तसेच त्यांच्या अपूर्ण राहिलेल्या स्वप्नांना पूर्णत्व देण्यासाठी कुटुंबीयांनी व कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करावे, अशी भावना व्यक्त केली.
अहिल्यानगर जिल्ह्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची संघटनात्मक बांधणी मजबूत करण्यासाठी नयन कदम सातत्याने प्रयत्नशील असून ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधून पक्षविस्ताराचे काम करत आहेत. युवकांना पक्षाशी जोडणे, स्थानिक प्रश्नांवर प्रभावीपणे आवाज उठवणे आणि सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या शासनापर्यंत पोहोचवणे यासाठी ते विशेष प्रयत्न करत असल्याचे कार्यकर्त्यांनी सांगितले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे जिल्ह्यातील मनसेच्या संघटनात्मक कामकाजाला नवी दिशा मिळत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.
कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना नयन कदम म्हणाले, "गट-तट विसरून पक्षाच्या मजबुतीसाठी काम करा. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला पुन्हा चांगले दिवस आणण्यासाठी सर्वांनी एकदिलाने प्रयत्न करावेत. संघटन मजबूत असेल तर जनतेचे प्रश्न अधिक प्रभावीपणे मांडता येतील."
यावेळी मा. अवधूत चव्हाण (उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य), मा. जातीन पवार (शाखाध्यक्ष, मागासवर्गीय विधानसभा गट क्र. १२), मा. रोहित जगताप (उपशाखाध्यक्ष, मागासवर्गीय विधानसभा गट क्र. १२), अविनाश पालवे, संतोष जिरेसाळ, अशोक आंधळे दादा डांगे प्रल्हाद कीर्तने, एकनाथवाडी सोसायटीचे चेअरमन शहादेव खेडकर बाळू आबा खेडकर सहदेव जाधव महादेव तांदळे महादेव खेडकर शहादेव रावसाहेब खेडकर, बाळासाहेब खेडकर यासह यांच्यासह भगवानगड परिसर व पाथर्डी तालुक्यातील असंख्य पदाधिकारी आणि महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.

### देविदास भाऊंचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी कुटुंबीयांनी पुढे यावे - नयन कदम

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सरचिटणीस तथा अहिल्यानगर संपर्कप्रमुख मा. नयन कदम साहेब यांनी स्वर्गीय देविदास भाऊ खेडकर यांच्या निवासस्थानी भेट देऊन कुटुंबीयांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी देविदास भाऊ यांनी पक्षवाढीसाठी केलेल्या कार्याचा गौरव करत त्यांच्या अपूर्ण राहिलेल्या स्वप्नांना पूर्णत्व देण्यासाठी कुटुंबीयांनी व कार्यकर्त्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. खेडकर कुटुंबीयांच्या वतीने नयन कदम यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी देविदास भाऊ यांच्या कार्याला अभिवादन करत त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा निर्धार व्यक्त केला.

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक: धारणी आणि चिखलदऱ्याच्या नगरसेवकांनी बजावला मतदानाचा हक्क

## भाजपा चे उमेदवार प्रवीण पोटे पाटील यांच्या विजयाचा विश्वास - आ. केवलरामजी काळे




दैनिक लोकनेता न्युज नेटवर्क
धारणी प्रतिनिधी - रजनिश साकले
धारणी - स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीची रणधुमाळी सध्या पाहायला मिळत आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज धारणी नगरपंचायत आणि चिखलदरा नगरपरिषद येथील नगरसेवकांनी आमदार केवलराम काळे यांच्या नेतृत्वात आपला अमूल्य मतदानाचा हक्क बजावला.
या निवडणुकीत महायुती आणि भारतीय जनता पक्षाचे अधिकृत उमेदवार मा. प्रवीण पोटे-पाटील रिंगणात असून, त्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लोकप्रतिनिधींचा उत्स्फूर्त पाठिंबा मिळत असल्याचे चित्र आहे. मतदानानंतर लोकप्रतिनिधींनी विजयाचे चिन्ह (व्हिक्टरी साईन) दाखवून आनंद व्यक्त केला.
यावेळी आमदार केवलराम काळे यांनी विश्वास व्यक्त केला की, "महायुतीचे उमेदवार मा. प्रवीण पोटे-पाटील यांना सर्वच लोकप्रतिनिधींचा भरघोस पाठिंबा मिळत असून, ते मोठ्या मताधिक्याने विजयी होतील यात शंका नाही."
तसेच, लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी आणि विकासाच्या प्रवाहात एकत्र येण्यासाठी या संपूर्ण मतदान प्रक्रियेत अत्यंत उत्साहाने सहभागी झालेल्या सर्व नगरसेवकांचे आमदार काळे यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले व आभार मानले.

# जांभूळवाडी परिसरातील धोकादायक वीज तारा तातडीने हटविण्याची मागणी;

## सात दिवसांत कार्यवाही न झाल्यास आंदोलनाचा इशारा

### "महावितरणने तातडीने दखल घ्यावी"

जांभूळवाडी परिसरातील झाडांमध्ये अडकलेल्या व धोकादायक ठरलेल्या वीज तारांमुळे नागरिक व जनावरे यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. महावितरणने तात्काळ कार्यवाही करून वीज तारा सुरक्षित कराव्यात, अन्यथा सात दिवसांनंतर ग्रामस्थांच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.



**लोकनेता न्यूज नेटवर्क**
| बाळासाहेब खेडकर पाथर्डी प्रतिनिधी
पाथर्डी तालुक्यातील मौजे एकनाथवाडी येथील जांभूळवाडी परिसरात वीज तारा झाडांमध्ये अडकून धोकादायकरित्या लोंबकळत असल्याने नागरिकांच्या जीवितास तसेच जनावरांच्या सुरक्षिततेस गंभीर धोका निर्माण झाला आहे. याबाबत ग्रामस्थांनी महावितरण विभागाकडे निवेदन देऊन तात्काळ कार्यवाहीची मागणी केली आहे.
ग्रामस्थांच्या निवेदनानुसार, जांभूळवाडी परिसरातील काही वीज तारा झाडांमध्ये अडकलेल्या अवस्थेत असून त्या खाली झुकल्याने अपघाताची भीती निर्माण झाली आहे. विशेषतः पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर वादळी वारे व पावसामुळे मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.
यापूर्वीही संबंधित विभागाकडे अनेक वेळा तक्रारी व पाठपुरावा करण्यात आला; मात्र अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याची खंत ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.
महावितरण प्रशासनाने तात्काळ पाहणी करून धोकादायक वीज तारा सुरक्षित कराव्यात व नागरिकांच्या जीविताचे रक्षण करावे, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.
तसेच निवेदन दिल्यानंतरही सात दिवसांच्या आत कार्यवाही न झाल्यास जांभूळवाडी व एकनाथवाडी ग्रामस्थांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. निवेदनावर शहादेव नामदेव खेडकर, पांडुरंग रामभाऊ चेमटे, महादेव मारुती खेडकर, बाळासाहेब भानुदास खेडकर, अशोक भानुदास खेडकर, बाळू शंकर खेडकर, मोहन शंकर खेडकर, भारत शिवाजी खेडकर, लक्ष्मण पांडुरंग गायकवाड, मच्छिंद्र अश्रुबा खेडकर, नवनाथ भक्त खेडकर, महादेव ज्ञानदेव तांदळे, नारायण बाबासाहेब चेमटे, शहादेव रावसाहेब खेडकर, दत्तू घनश्याम आंबेकर, शहादेव ज्ञानदेव जाधव, लक्ष्मण पांडुरंग गायकवाड व प्रल्हाद कीर्तने आदी ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# आम्हाला पाहिजे फक्त कर्जमुक्ती ! तहसीलवर शिवसेनेचा मोर्चा !



**दै. लोकनेता न्यूज नेटवर्क**

शिरूर कासार : शेतकऱ्यांना सरसकट कर्जमुक्त करा या प्रमुख मागणीसाठी मंगळवारी शिवसेना (उबाठा ) ने ट्रक्टर मोर्चा काढला होता , मोठ्या संखेने शेतकरी मोर्चात सहभागी झाले होते . जिजामाता चौकातून हा मोर्चा तहसीलवर घोषणाबाजी करत धडकला या मोर्चाचे नेतृत्व शिवसेनेचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम जिल्हा उपाध्यक्ष अदिनाथ खेडकर तालुकाप्रमुख सोपानभैय्या मोरे यांनी सांभाळले होते .
सरसकट कर्जमुक्ती , पेट्रोल डीझेल भाववाढ कमी करा , शेतमालाच्या खरेदीसाठी हमीभाव खरेदी केंद्र सुरू करा , कांदा भाव , पिकविमा , खतपुरवठा व काळाबाजार ,शेतपंपाना बारा तास विजपुरवठा ,३३ हजार कोटीच्या मदत पॅकेजची अंमलबजावणी या मागण्यांचे निवेदन तहसीलदार सुरेश घोळवे यांना देण्यात आले . साठ ट्रक्टर व एक प्रतिकात्मक बैलगाडी यांचेसह गळ्यात भगवे गमछे घालून मोर्चा घोषणाबाजीने चांगलाच गाजला .

# मरखेल पोलिसांचा अंध खुनाचा उलगडा; पत्नीसह एकाला अटक

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
देगलूर प्रतिनिधी / संतोष चिद्रावार लोणीकर
मरखेल पोलिसांनी अत्यंत कौशल्यपूर्ण व तांत्रिक तपासाच्या जोरावर दोन महिन्यांपासून बेपत्ता असलेल्या व्यक्तीच्या अंध खुनाचा (Blind Murder) उलगडा करून पत्नीसह एका आरोपीला अटक केली आहे. या कारवाईमुळे पोलिसांच्या तपास कौशल्याचे पुन्हा एकदा दर्शन घडले आहे.पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, उदगीर तालुक्यातील एकुर्की रोड येथील रहिवासी रामकिशन गंगाधर गोलेवार (वय 55) हे 25 एप्रिल 2026 पासून बेपत्ता होते. त्यांच्या पत्नी देवशाला रामकिशन गोलेवार यांनी 17 मे रोजी मरखेल पोलीस ठाण्यात मिसिंगची तक्रार दाखल केली होती. सुरुवातीला हे प्रकरण केवळ बेपत्ता व्यक्तीचे वाटत असले तरी तपासादरम्यान अनेक संशयास्पद बाबी समोर आल्या.
पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, अपर



पोलीस अधीक्षक अर्चना पाटील व सुरज गुरव तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली मरखेल पोलिसांनी तपासाची सूत्रे हाती घेतली. तपासादरम्यान बेपत्ता व्यक्तीची पत्नी देवशाला गोलेवार व आमदापूर (ता. देगलूर) येथील सुभाष व्यंकन्ना यतवाड यांच्यात वारंवार संपर्क होत असल्याची माहिती समोर आली. दोघांच्या मोबाईल कॉल डिटेल रेकॉर्ड (CDR) चे विश्लेषण करण्यात आले असता महत्त्वाचे धागेदोरे मिळाले.
तांत्रिक तपासासोबतच स्थानिक माहिती, साक्षीदारांचे जबाब, संशयितांच्या हालचाली आणि उपलब्ध परिस्थितीजन्य पुरावे यांची सांगड घालत पोलिसांनी तपास पुढे नेला. सुरुवातीला चौकशीदरम्यान देवशाला गोलेवार यांनी दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी गोळा केलेल्या ठोस पुराव्यांसमोर त्यांची कबुली फुटली.
चौकशीत देवशाला गोलेवार यांनी सुभाष यतवाड यांच्या मदतीने पती रामकिशन गोलेवार यांचा खून केल्याची कबुली दिली. खून केल्यानंतर मृतदेह शेतातील एका ठिकाणी पुरल्याचेही त्यांनी सांगितले. त्यानुसार कार्यकारी दंडाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत उत्खनन करण्यात आले असता मानवी सांगाडा व इतर अवशेष हस्तगत करण्यात आले. घटनास्थळावरून कपडे, डीएनए नमुने तसेच गुन्ह्यात वापरलेले हत्यार जप्त करण्यात आले.
या प्रकरणी मरखेल पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता 2023 च्या कलम 103, 238 व 3(5) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी देवशाला रामकिशन गोलेवार व सुभाष व्यंकन्ना यतवाड यांना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास मरखेल पोलीस करीत आहेत.
या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पोलीस अधीक्षकांनी तपास पथकाचे अभिनंदन केले आहे.

# राज्यस्तरीय आदर्श महाराष्ट्र समाजरत्न पुरस्कार 2026 प्रा. स्मिता शेखर कांबळे यांना प्रदान.

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

मुंबई : (प्रतिनिधी विजय जगताप) ए. डी. फाउंडेशन महाराष्ट्र राज्य या संस्थेच्या माध्यमातून समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा महाराष्ट्र समाजरत्न पुरस्कार 2026 देऊन गौरव करण्यात आला. समाजासाठी सातत्याने कार्य करणाऱ्या महान व्यक्तींच्या कर्तृत्वाचा सन्मान व्हावा, त्यांना प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्या कार्यातून इतरांनाही प्रेरणा मिळावी या उद्देशाने हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. सोलापूर विजापूर रोडवरील निर्मिती लॉन्स येथील येथील सभागृहामध्ये अत्यंत उत्साहपूर्ण, दिमाखदार वातावरणात संपन्न झालेल्या या सोहळ्यात विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व सेवाभावी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी व सन्मानपत्र देऊन गौरवण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्याचे माजी दुग्धविकास कॅबिनेट मंत्री मा. श्री महादेव जानकर तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त मा. श्री प्रदीप गोरड, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या मा. मनीषा माने, राष्ट्रीय समाज पक्षाचे युवक प्रदेशाध्यक्ष मा. श्री अजित पाटील, स्वागताध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सांगली जिल्हा अध्यक्ष मा. श्री विवेक कोकरे, संस्थापक अशोक गोरड यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी ए. डी. फाउंडेशनच्या सकारात्मक विधायक व सातत्यपूर्ण वाटचालीबद्दल सर्वच मान्यवरांनी कौतुक केले.

तसेच व्यासपीठावरील प्रमुख पाहुणे माजी मंत्री श्री महादेव जानकर, सहाय्यक पोलीस आयुक्त श्री प्रदीप गोरड आणि इतर मान्यवरांचे स्वागत आणि प्रास्ताविक फाउंडेशनचे अध्यक्ष अशोक गोरड यांनी केले.

शिक्षण, सेवाभाव आणि सुसंस्कृत दृष्टिकोन या तीन आधारांवर उभे असलेले व्यक्तिमत्व म्हणजे ताम तलाव, वसई, जि. पालघर येथील प्रा. स्मिता शेखर कांबळे. शैक्षणिक क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या प्रा. स्मिता शेखर कांबळे यांची प्रामाणिकता, विद्यार्थ्यांच्या पालकांशी असलेला थेट संवाद आणि शैक्षणिक गुणवत्ताविषयी दृष्टिकोनामुळे पालकांचा ठाम विश्वास त्यांनी संपादन केला आहे. प्रा. स्मिता कांबळे यांचा प्रामाणिकपणा आणि निर्णयक्षमता यामुळे त्यांना वसई येथील




सर्वसामान्य नागरिकांमध्ये आदराचे स्थान आहे. त्यांच्या शैक्षणिक कार्यातून आजही अनेक युवती प्रेरणा घेतात आणि आत्मनिर्भर बनण्यासाठी यशस्वी पाऊले टाकत आहेत. म्हणूनच त्यांना अनेक राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. अनेकांना त्यांनी शैक्षणिक मार्गदर्शन करून स्वावलंबी बनवले आहे. त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन शैक्षणिक क्षेत्रातील आदर्श शिक्षिका म्हणून राज्यस्तरीय आदर्श महाराष्ट्र समाजरत्न पुरस्कार 2026 देऊन त्यांना गौरवण्यात आले. कार्यक्रमात निवड झालेल्या सर्व पुरस्कार्थींना मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ए. डी. फाउंडेशन समूहाच्या संपूर्ण टीमने विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. घनश्याम चौगुले यांनी प्रभावीपणे करुन उपस्थित मान्यवरांचे आभार मानले. हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला असून समाजातील महान व्यक्तींच्या कर्तृत्वाला सलाम करणारा, प्रेरणादायी सोहळा ठरला.

# भंगेवाडी ग्रामपंचायतच्या ढीसाळ कारभाराविरोधात नागरिकांचा धरणे आंदोलनाचा इशारा.....

लोकनेता न्यूज नेटवर्क
जीवन जाधव औसा..


प्रतिनिधी: औसा तालुक्यातील भंगेवाडी गावात जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठ्याचे कामे करण्यात आली. गेल्या तीन वर्षापासून विहीर पाण्याने भरून असताना मात्र गावात ग्रामपंचायतच्या डिझाईन योजना मुळे ग्रामस्थांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. त्या विरोधात ग्रामस्थांनी दिनांक 24 जून रोजी धरणे आंदोलन करण्याचा इशारा ग्रामपंचायतीला दिलेला आहे.

औसा तालुक्यातील भंगेवाडी ग्रामपंचायत ने गेल्या तीन वर्षापासून जल जीवन मिशन अंतर्गत विहीर पाण्याची टाकी व घरोघरी नळ योजना राबविलेली आहे. मात्र कंत्राटदारांने विहिरीला विद्युत पुरवठा न केल्यामुळे विहीर



तुडुंब भरलेली असतानाही, गावकऱ्यांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. तसेच गेल्या वर्षी नळाला होणाऱ्या पाणीपुरवठ्यात सापाचे तुकडे व इतर जीव जंतू आढळून आल्याने ग्रामस्थांनी ग्रामपंचायत इकडे आरो फिल्टर संच उभा करून शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्याची मागणी केली होती. परंतु ग्रामपंचायतीने त्याबाबत गंभीर दखल न घेता फक्त चालढकल करण्याचे काम केले आहे असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे कारण ग्रामपंचायत ने गेल्या एक वर्षात आरो फिल्टर संच उभारण्यासाठी फक्त एक लोखंडी सांगाडा उभा करून ठेवलेला आहे. त्यामुळे ग्राम विकास अधिकारी यांनी तात्काळ जलजिवन योजनेअंतर्गत झालेल्या विहिरीतून पाणी उपसा करून गावात दररोज शुद्ध पाणीपुरवठा करवा, खेळाडूंना खेळाचे मैदान उपलब्ध करून द्यावे., बंद असलेले पथदिवे चालू करावे या मागण्या संदर्भात कार्यवाही करावी अन्यथा ग्रामस्थांनी अशा ढिसाळ कारभाराविरोधात दि. 24 जून पासून ग्रामपंचायत कार्यालयासमोर धरणे आंदोलन करणार असल्याचा इशारा ग्रामपंचायतीला दिलेला आहे.

## परभणी – हिंगोली स्थानिक स्वराज्यसंस्था निवडणूक : ९९.७९ टक्के मतदान



**लोकनेतान्युज नेटवर्क**
परभणी प्रतिनिधी :- रमेश मुलगीर

परभणी,दि.18 रोजी झालेले मतदान परभणी-हिंगोली स्थानिक स्वराज्यसंस्था मतदारसंघात अंतीम मुदतीत म्हणजे सायंकाळी 4 वाजेपर्यंत 99.79 टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.

या मतदारसंघात एकूण 466 मतदार आहेत. त्यापैकी 465 मतदारांनी दुपारी 4 वाजेपर्यंत मतदानाचा हक्क बजावला. परभणीतील तहसील कार्यालयातील मतदान केंद्रावर एकूण 128 पैकी 128, सेलूतील मतदान केंद्रावर 59 पैकी 58, गंगाखेडातील केंद्रावर 73 पैकी 73, पाथरीतील केंद्रावर 74 पैकी 74, हिंगोलीतील केंद्रावर 58 पैकी 58, कळमनुरी केंद्रावर 23 पैकी 23 व वसमत येथील मतदान केंद्रावर 51 पैकी 51 मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. एकूण 465 मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.

## *खासदार संजय जाधवांच्या बंडखोरीने परभणीत शिवसैनिक आक्रमक;*

### “काढली प्रतीकात्मक अंत्ययात्रा, केंद्र सरकारकडून ‘वाय प्लस’ सुरक्षा”



**दैनिक लोकनेता न्यूज़ नेटवर्क**
परभणी प्रतिनिधी: रमेश मुलगीर

परभणी:
शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे परभणी लोकसभा मतदारसंघाचे खासदार संजय जाधव यांनी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची साथ सोडण्याचा निर्णय घेतल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. संजय जाधव यांनी आपल्या इतर पाच सहकारी खासदारांसह ठाकरे सेनेपासून फारकत घेत स्वतंत्र गट स्थापन करण्याची मागणी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याकडे केली आहे. दोन दिवसांपूर्वीच ते एका खाजगी विमानाने दिल्लीला रवाना झाले होते.

शिवसैनिकांचा तीव्र संताप, जोडेमार आंदोलन

संजय जाधव यांच्या या बंडखोरीचे पडसाद परभणी जिल्ह्यासह राज्यभरात उमटले आहेत. २०१४ पासून परभणीचे प्रतिनिधित्व करणारे जाधव हे उद्धव ठाकरेंचे विश्वासू शिलेदार मानले जात होते. मात्र, त्यांनी घेतलेल्या या निर्णयामुळे निष्ठावान शिवसैनिकांचा संताप अनावर झाला. परभणीतील सोनपेठ येथे संतप्त शिवसैनिकांनी एकत्र येत जाधव यांच्याविरोधात तीव्र ‘जोडेमार’ आंदोलन केले. कार्यकर्त्यांनी त्यांच्या छायाचित्राला चपलांचा हार घातला आणि ‘गद्दार संजय जाधव’ अशा घोषणा देत शहराच्या मुख्य भागातून त्यांची प्रतीकात्मक अंत्ययात्रा काढली. छत्रपती शिवाजी महाराज चौकात शेकडो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत जाधवांच्या प्रतिमेचे जाहीर दहन करण्यात आले. “आम्ही फक्त आणि फक्त उद्धव ठाकरेंसोबतच आहोत”, असा इशारा या आंदोलनातून शिवसैनिकांनी दिला.

जिल्ह्यात संमिश्र पडसाद

जाधव यांच्या या निर्णयावर परभणीत संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. काही शिवसैनिक त्यांना गद्दारीबाबत जाब विचारण्याच्या तयारीत आहेत, तर काही समर्थकांनी त्यांच्या या बंडखोरीचे समर्थनही केले आहे.

केंद्र सरकारकडून ‘वाय प्लस’ सुरक्षा प्रदान

शिवसैनिकांमधील वाढता रोष आणि कायदा-सुव्यवस्थेची परिस्थिती पाहता, केंद्रीय गृह मंत्रालयाने खासदार संजय जाधव यांच्या सुरक्षिततेत मोठी वाढ केली आहे. त्यांना केंद्र सरकारकडून ‘वाय प्लस’ (Y+) दर्जाची सुरक्षा प्रदान करण्यात आली आहे. या सुरक्षेंतर्गत एकूण ११ सुरक्षा अधिकारी तैनात केले जातात, ज्यामध्ये २ ते ४ कमांडो, सशस्त्र पोलीस आणि पीएसओ (PSO) दर्जाच्या अधिकाऱ्यांचा समावेश असतो. ही सुरक्षा त्यांच्या निवासस्थानी तसेच प्रवासादरम्यान लागू असेल. सध्या खासदार जाधव मतदारसंघाबाहेर असले, तरी त्यांच्या परभणीतील घरासमोर आणि कार्यालयासमोर कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

# वट पौर्णिमेच्या उत्सवापूर्विच भादा औसा रोड वरील छायादार वटवृक्षाची खुलेआम कत्तल.... नागरिक सूस्त,प्रशासन झोपेत....

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

औसा|महेश कोळी

औसा: तालुक्यातील भादा ते औसा रोडवरील हळद दुर्ग शिवारामध्ये असणाऱ्या भादा ते औसा या मुख्य रोड लगत असलेल्या आणि अंदाजे गेल्या आठ ते दहा वर्षाचे वय असलेल्या वटवृक्षाचे झाड हे आता येणाऱ्या वटपौर्णिमेच्या पूर्वीच कत्तल करण्यात आल्याने त्या झाडाच्या पूर्ण फांद्या तोडून टाकल्या आहेत.
यामुळे करुणा स्थापित मन असलेल्या अनेक नागरिकांना हे दृश्य पहावत नाही अशा प्रतिक्रिया त्या वृक्षाकडे पाहिल्यावर उमटत आहेत.परंतु या बाबीकडे संबंधित गावातील जागरूक नागरिक आणि संबंधित प्रशासकीय




अधिकारी यांना या घडलेल्या आणि छायादार वृक्ष असलेल्या वटवृक्षाची तोडलेली सर्व विस्तारात्मक फांदी यामुळे निसर्गाचा मोठा ऱ्हास होत आहे. आणि पौर्णिमेला मनोभावे पूजा करणाऱ्या महिलांच्या त्या भावनेचे काय? हा वटवृक्ष रोडच्या अगदी लगत असल्याने या ठिकाणी अनेक वेळा या रस्त्याने वाहतूक करणारे नागरिक थांबतात आणि विसावा घेतात तर भविष्यामध्ये ही मोठ्या प्रमाणात या वटवृक्षाच्या छायेचा नागरिकांना आणि निसर्गाला पण वातावरण निर्मितीला मोठा आधार मिळणार आहे.ज्यामुळे निसर्गाचे समतोल राखले जाईल आणि वातावरणामध्ये शुद्ध हवेचे प्रमाण वाढण्याकरीता हा हिरवागार वटवृक्ष मोठे मोलाचे योगदान देतो ही बाब नागरिकांनी प्रशासनाने विसरता कामा नये. आणि अशा होणाऱ्या नैसर्गिक पातळीवर धोका निर्माण करणारे आणि करते होऊ नये आणि झाडे मोठ्या प्रमाणात जगली पाहिजे ही बाब नागरिकांनी लक्षात घेणे आवश्यक आहे.कारण निसर्ग हा समतोलात्मक वातावरणामध्ये व्यवस्थित राहिला तर मानवी जीवन सुखी समृद्धी राहील याकरिता निसर्गातील अशी औषधी वृक्ष आणि निसर्गामध्ये ऑक्सीजन प्रमाण समतोल राखणारी वृक्ष जगली पाहिजे.असे मोठी झाडे तोडणारावर कार्यवाहीचा दणका बसला पाहिजे जेणेकरून अशा घटनांचा पुनरावृत्ती होणार... याकरिता प्रत्येक भारतातील नागरिकांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे....

# जावळी येथे शेतकऱ्यांसाठी नैसर्गिक शेतीशाळा वर्ग 1 संपन्न......

### शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीचे तंत्रज्ञान.कमी खर्चातील शेती.देशी बियाणे संवर्धन.जीवामृत.बीजामृत तसेच सेंद्रिय शेतीविषयी माहिती देण्यात आली..

**दैनिक लोकनेता न्यूज़ नेटवर्क**
जीवन जाधव औसा..
आज रोजी औसा तालुक्यातील जावळी येथे शेतकऱ्यांसाठी नैसर्गीक शेतीशाळा वर्ग 1 चे आयोजन करण्यात आले होते सदरील शेतीशाळेस मा.प्रकल्प उपसंचालक आत्मा लातूर सौ.मनीषा बांगर मॅडम प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होत्या यावेळी नैसर्गिक शेतीचे महत्त्व व खताचा संतुलित वापर , खेती बचाव अभियान या संदर्भात उपस्थित महिला शेतकरी यांच्याशी चर्चा करून उत्पादन खर्च कमी करून सेंद्रिय निविष्ठा निर्मिति करण्याचे आव्हान बांगर मॅडम यांनी केलं व सौ.लता हेम्बाडे नैसर्गिक शेतीशाळा प्रेरक महिला शेतकरी यांनी दशपर्णी अर्क याचे प्रात्यक्षिक करून दाखविले




तालुका तंत्र व्यवस्थापक यांनी bbf, बीजप्रक्रिया,सोयाबीन वाणाची निवड या विषयी मार्गदर्शन केले.सहाय्यक तंत्र व्यवस्थापक गायकवाड विनायक यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यां शेती कार्यशाळेमुळे जावळीसह परिसरातील शेतकऱ्यांना या कार्यशाळेच्या माध्यमातून नैसर्गिक शेती कशी करायची याचा प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी खरीप हंगाम पूर्व प्रशिक्षण व कथा चा संतुलित वापर Ei nino उपाय योजना किती बचाव योजना व नैसर्गिक कार्यशाळा संपन्न झाली
यावेळी जावळी गावचे उपसरपंच जयश्री सातपुते. सुरेखा हेंबाडे वंदना हेंबाडे. पार्वती चिंचोले रेखा मुगळे.अशा मुगळे. वर्षा सुतार.भाग्यश्री हेबाडे.रुक्मीन भोसले.रुकसाना पटेल.पाशाबी पटेल. साधना हेबाडे.सुवर्णा भोसले.अर्चना चिंचोले. अश्विनी थोरात.कमल हेंबाडे जयश्री यादव.सुजाता कांबळे.वंदना कांबळे.लता हेंबाडे. जावळी गावातील शेतकरी व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते...

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 7499615933

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ७४९९६१५९३३ .या अंकात प्रकाशित झालेल्या बातम्या व लेखा या मधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही (वाद विवाद गेवराई न्यायालयाअंतर्गत)